म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ८२२
२-७ १९०५

REFBK-0000277
REFBK-0000277

स. ठाण
काव्य
122
906

# वीसंस्मृति

## ( काव्य. )

कर्तै,

## एकनाथ गणेश भांडारे.

किंमत २ आणे.

मुंबईत:–निर्णयसागर छापखान्यांत छापिलें.

# सखीसंस्मृति.

( तारीख १८ जानेवारी १९०५ )

हें

## काव्य

## एकनाथ गणेश भांडारे,

यांनीं रचिलें.



REFBK-0000277

सदैव बसलीस तूं अढळ कीर्तिच्या मंदिरीं
बुडे करुणसागरीं परि तुझा सखा सुंदरि !—शोकावर्त.

अक्टोबर १९०५.

*All rights reserved.*

किंमत २ आणे.

मुंबई येथें
जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर"
छापखान्यांत छापिलें.

☞ **विशेष सूचनाः**—हीं पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—रा० रा० रघुनाथ महादेव देवगीरकर, **शीव**—मुंबई.

# प्रस्तावना.

ह्या पृथ्वीसारख्या अफाट रंगभूमीवर संसाररूपी नाटकाचे असंख्य प्रयोग नित्यशः चालूच आहेत. त्यांपैकीं कोणतीं नाटकें सुखपर्यवसायीं होतात व कोणतीं दुःखपर्यवसायीं होतात हें सांगणें कठीण आहे. तथापि पहिल्यापेक्षां दुसऱ्यांचाच प्रादुर्भाव ह्या जगांत विशेष असावा असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

अशा नाटकांतील नायक आणि नायिका ह्मटल्या ह्मणजे पति आणि पत्नी होत. अथवा संसाररूपी रथाचीं तीं दोन चक्रेंच होत. अशा चालत्या रथाचें एक चक्र मोडून पडलें ह्मणजे त्या रथाची पुढें कशी वाताहत होते याचा अनुभव पुष्कळांस आहेच.

त्यांतून तारुण्यामध्यें एखाद्या दुबळ्या मनुष्याची, बरोबरीची अशी सुशील व प्रेमळ स्त्री काळरूपी पडद्याचे आंत कायमची अंतर्धान पावली ह्मणजे त्याच्या दुर्दैवाचा कळस होतो. आणि असाच घोरतर प्रसंग माझेवर आल्यामुळें माझ्या दुःखित मनाला जें कांहीं वाटलें तें 'सखीसंस्मृति' रूपानें बाहेर पडलें आहे.

ह्या काव्यावर रा० ब० विष्णु मोरेश्वर महाजनी एम्० ए०; रा० सा० गोविंद वासुदेव कानिटकर, बी० ए०, एल् एल्० बी०; रा० रा० शंकर गणेश देशपांडे, बी० ए०, एल् एल्० बी०; व रा० रा० विठ्ठल भगवंत लेंभे; यांचे अनुकूल अभिप्राय आल्यावरून तें मी रसिकांपुढें ठेवण्याचें साहस करीत आहें. तथापि आपला अमोल वेळ खर्च करून या मान्य ते …वरांनीं प्रस्तुत काव्यांतील कित्येक दोषस्थळें दाखवितांना

मला ज्या महत्वाच्या सूचना केल्या त्यांबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

शेवटीं या काव्यांत असलेल्या गुणलवांचा रसिकजनांनीं कृपादृष्टीनें स्वीकार करावा अशी त्यांस माझी प्रार्थना आहे.

मुंबई, दादर;
१।१०।१९०५.

एकनाथ गणेश भांडारे.

(१ काव्य१०६

# सखीसंस्मृति.

## काव्य.

( पौष शु० १२, शके १८२६. )

### श्लोक.

नीलांबरीं धवल शीतल चंद्रमा ये
शोधी निशासुरमणी अभिसारिका हे !
दृष्टीं पडे न ह्मणुनी मनिं खोंचलासे
ये म्लानता म्हणुनि त्या दयितासि भासे. १

अस्ताचलावरि दिसे रवि कांतिहीन
प्राचीकडे बघुनि होइ मनांत खिन्न !
तो दिग्वधूविरह दुःसह त्यास झाला
वेडावुनी ह्मणुनि मानसिं तोहि गेला ! २

तेवीं गभीरगुरुगर्जित सागराचें
दे भी क्षणोक्षणिं अहा ! हृदयासिं साचें !
रत्नाकरा न नव रत्न दिसे ह्मणूनी
देई जगांत करुणस्वर तो भरूनी ! ३

---

१ कवीच्या पत्नीचें देहावसान सायंकाळीं चार वाजतां झालें. ते वेळीं पूर्वेस चंद्र व पश्चिमेस सूर्य दिसत होता.

दे चंचल प्रकृति सोडुनि मंद वायु
झालें क्षणैक जग हें मजला गतायु !
हें विश्व शून्य गमतें मज आज कां हो ?
राहो सुखी सकलमंगलदा सखी हो ! ४

औदास्य मत्सदनिं पूर्ण उरे भरूनी
ऐकूं न ये श्रवणमंगल मंजु वाणी
माझें अहा ! धडधडे उर हें अझूनी
नेत्राश्रु हे गळति तद्गुण हो ! स्मरूनी ! ५

ती भूगतासुलतिकाकलिकाच वाटे !
तेव्हां तिची सुतनया[1] तिज साश्रु भेटे !
[2]त्या अश्रुंनीं सकल[3]नेत्र भरूनि आले
[4]दुःखी गृहास मम जे करिते जहाले ! ६

चिन्हें बघूनि असलीं मनिं धस्स झालें !
माझे मनांत भलतें सलतेंच आलें !
प्राणप्रिये ! नयन तों तव खोल गेले !
गेले कपोल बसुनी रमणीयशीले ! ७

दृष्टी तुवां मजकडे परि साश्रु केली
गे ! कल्पना तव मनीं तरि काय आली ?
शक्ति प्रिये ! न उरली तुज बोलण्याला !
गे ! मौन काय सुख देइल हें प्रियाला ? ८

---

१ चि० गोदावरी. २ गोदावरीच्या त्या अश्रूंमुळें. ३ सर्वांचे डोळे
४ 'ज्यांनीं गृहास मम त्या समदुःखि केलें !'—पाठांतर.

डोळे तुवां प्रियसखे ! मिटलेस हाय !
चैतन्यहीन पडला तव रम्य काय !
त्वां टाकिलीस धरणीवर मान खालीं !
गेलीस ना निघुनि तूं त्रिदिवीं अकालीं ? ९

माझे प्रिये ! सुचरिते ! गिरिजे ! सुशीले !
हें काय हातुनि तुझ्या बघ आज झालें ?
ध्यानीं मनींहि नसतां मज टाकुनीयां
गेलीस मुक्तिसखिच्या सदनीं रमाया ! १०

अव्हेरुनी मज पतीकुलदैवतातें
अव्हेरुनी तव मनोहर कन्यका ते
अव्हेरुनी मम मनोरथमंदिरातें
केवीं तुझ्या सदन तें रुचलें मनातें ? ११

रागावणें प्रणयजन्य तुझें शुभांगे !
आनंददायक गमे नच काय सांगें ?
तो आज गे ! प्रणयकोप भयासि दावी !
सत्संगतीहि जगतीं असुखा कदां वी !! १२

प्राणाहुनी प्रियसखे ! जपलों तुला मी !
जेवीं जपे कृपण तो स्वधनास धामीं[2] !
सौख्यार्थ म्यां तव भगीरथ यत्न केले !
नाहीं परंतु मजला यश त्यांत आलें ! १३

विश्वासुनी विधिवरीं बसलों अभागी !
अंतीं तुझा विरह दुःसह मीच भोगीं !

---

१ चि० गोदावरी. २ 'नामी'—पाठांतर.

तो होय गे ! निरवधी परि हाय हाय !
म्यां या जगांत करणें तुजवीण काय ? १४

चंद्रास होय रमणी बघ रोहिणी ती !
व्योमा महा खुलविते उडुदिव्यपंक्ती !
बालारुणा कवळि सुंदर सुप्रभात !
संधिप्रकाश मिरवे जधिं सांज होत ! १५

ते ओषधीपतिकर प्रिय शीत शीत !
वार्राशिच्या लहरिंना कुरवाळितात !
आकाशधौतसरितायुवती प्रसन्न !
नक्षत्रपुंज करि सुंदर धन्य धन्य ! १६

वायू परागनवरंजित दावि माया
मंदाकिनीमृदुतरंगिणिशीं रमाया !
वृक्षास सुंदर लता परिरंभ देती !
भृंगाप्रती कमलिनी मधु दे प्रभातीं ! १७

सारांश, विस्तृत धरेवर या अझून !
एकाकिनी प्रियसखे ! कुणिही असे न !
गे ! दैवहीन तुजवांचुनि मात्र एक
मोजूनि कंठित असे दिन एक एक ! १८

तो मी तुझा प्रियसखा जगतीं तयाला
कोणीच मित्र नुरला, बघ दैवलीला !
"नाहीं जगांत सखया ! कुणिही कुणाचें !"
हें प्रत्यया वच तुझें मम येत साचें ! १९

तूं जाहलीस न कळे परि गुप्त कोठें !
शोधार्थ यत्न करुं मी किति मोठमोठे ?
होशी कुठें ? बघुं कुठें ? दिसशी न कोठें ?
धुंडाळुं मी जगतिं या किति देश मोठे ? २०

माते धरे ! तव सुता मज सांग कोठें ?
वायो ! तुझी भगिनि सुंदर होय कोठें ?
बा भास्करा ! नयन सौम्य तुझे करी ते
आणि प्रिया मम कुठें मज सांग कीं ! ते ! २१

हे वारिराशि वरुणाधिपते ! उदारा !
सांगें मला सदय होउनि, द्या न थारा.
लाटा तुझ्या खवळतां अति उंच जाती
त्यांनीं न का सखि नभीं मम पाहिली ती ? २२

ब्रह्मांडकोटिहुनि विस्तृत तूंच होशी
व्योमा ! न तूं कधिं कुणा लव हार जाशी !
कोट्यावधी त्वदुदरीं सुरलोकमाला
त्या त्वां कधीं बघितलें मम कां प्रियेला ? २३

कोणी न उत्तर मला कसलेंहि देती
आश्चर्य हेंचि ! सुमती, वदती न नीति !
होता मला विधि परी अनुकूल जेव्हां
कोणी कदापि नव्हतें प्रतिकूल तेव्हां ! २४

अस्तु. प्रिया मम वसो न वसो जगांत
कोठें असो, परि असो सखि ती सुखांत !

जें जें तथापि दिसतें तुजवीण आर्ये!
तें तें मला गमतसे जड, शून्य, भार्ये ! २५

हा चंद्र, हा उदधि, तालतमालमाला!
मुंबापुरीधवलसौधहि चंद्रशाला !
हा मंद वायु, गिरिचीं अति रम्य शृंगें !
देती मला विरहदुःख बहू वरांगे ! २६

हा बाग आणि फुलल्या नव मंडपाची
शोभा प्रिये ! तुजविना अति दुःखदाची !
गे ! ह्या कड्यावरुनि निर्झर धांव घेती
हे अश्रुपूर गिरिचे मज भासताती. २७

जें हें तुझ्या पदरजीं अति धन्य झालें
जेथें तुझें मन बहू रमलें सुशीले!
जेथें अनेक दिन आपण काढियेले
गेह स्मशान अवघें बघ तेंच झालें! २८

तूं बैसलीस सखये ! उठलीस जेथें
आनंदयुक्त असतां रमलीस जेथें !
गाणींहि सुंदर तशीं म्हटलींस जेथें
वाटे स्मशान भरलें अवघेंचि तेथें ! २९

तेणें भयाण दिसतें मज सर्व गेह
दृष्टीसमोर दिसशी परि तूं विदेह !
शुक्तीपुटीं विमल जीवनहीन वाटे
मुक्तावली विलसते; परि तेज कोठें ? ३०

सारेंच हें जग तुझ्याविण शून्य झालें!
पाहें तयास तुजवांचुनि दैन्य आलें!
तूं मंगला सकल मंगलमंडनांची!
शोभा तुझ्याविण नुरे सखि! या जनाची! ३१

लोण्याहुनी मृदुल होय तवांतरंग!
तेवीं तुझ्या प्रियतमे! मनिंचे तरंग—
ठावे मलाच असती न दुज्या कुणाला
गे! तूं दयाघनघटा मज चातकाला! ३२

माझें मनोगत सदोदित तूज ठावें
स्वप्नींहि तूं न मम विप्रिय आठवावें!
तेव्हां मला प्रियकरा अपुल्या पतीला
गेलीस टाकुनि कशी त्रिदशालयाला? ३३

छे छे! तसें कधिं तुझ्या नव्हतें मनांत
हें त्वत्कृती कथिति ज्या उरल्या गृहांत!
पाहून त्या मज तुझी स्मृति मात्र होते
माझ्या मनोभुवनिं घोळशि तूं सुकांते! ३४

कांहीं असो, तुज अकालिंच मृत्यु आला!
घेऊनि निर्दय बळें तुज काळ गेला!!!
तेणें तुझे कमलनेत्र मिटूनि गेले!
म्लानत्व आननिं तुझ्या अवघें उदेलें! ३५

वृक्षावरील लतिका पडते तुटूनी
गे! गंधहीन सुम जाय वनीं सुकूनी!

जेवीं नदी रुचिरजीवनहीन दीन
तेवीं बघून तुजला मन होय खिन्न ! ३६
निश्चेष्टही तनु तुझी मज रम्य वाटे !
आहे धरेवर खरें सुख तेंहि कोठें ?
तूं होस मत्प्रियतमा प्रिय गे ! तुझा मी !
दुर्दैव हाय ! बसवी मज शोकधामीं ! ३७
प्रार्थू कुणा मम सखी मज द्या अतां मी ?
आणूं कुणा कळवळा समयीं अशा मी ?
राहूं तुझेविण कुठें जगतांत हा ! मी ?
जाऊं कुठें करित शोक असा प्रिये ! मी ? ३८
हे अश्रुपूर नयनांतुनि वाहताती !
गे ! प्राणहीन तव ही तनु न्हाणिताती !
बाष्पांबुपूर्णनयनांतिल ह्या पतीचें
हें स्नान होय दयिते[1] ! तुज शेवटीचें ! ३९
नीति, स्वभाव, नय, सात्विकबुद्धि, शील
होते तुझ्यांत सगळे गुण ते अमोल !
माझ्या परी पदरिं जोंवरि पुण्य होतें
झाला तुझा सुखद तोंवरि लाभ मातें. ४०
मत्सौख्यभानु विरहार्णविं गे ! बुडाला
त्वत्प्रेमनिर्झर तुझ्यासह गुप्त झाला !
मद्दृष्टिला सुखदसें स्थल संसृतीचें
झालें अदृष्ट; फळ हें भवितव्यतेचें ! ४१

---

१ 'गिरिजे !' किंवा 'सखये !'—पाठांतर.

तूं काळरूप पडदा वरतीं करूनी
अज्ञातशा भुवनिं गेलिस गे! निघूनी!
तें दूरदूर किति दूर असे कळेना
माझ्याकडे तव कृपालहरी वळेना! ४२
मन्नित्यमंगलमयी गृहदेवता तूं!
मत्कार्यमंत्रि, वचतत्पर दासि गे! तूं!
धर्मार्थकाम मम तूं नव चारुशीला
मत्प्रेमविश्व मम तूं दयिता रसाला! ४३
लोकोत्तर प्रिय असें मम रत्न गेलें!
तें गोड भाषण सखे! तव लुप्त झालें!
त्वद्दिव्य दृष्टि अतुला सुखवृष्टि होय!
त्वत्प्रेम होइल पुन्हां मज लभ्य काय? ४४
यालागिं आज लहरी करुणारसाच्या
कल्लोळ थोर करिती हृदयांत साच्या!
वाटे फुटेल मज तें[1] निमिषांत तेणें
वज्राहुनी कठिण तें[1] फुटतें कशानें? ४५
माझे जिवा जर कुठें कधिं कांहिं झालें
होतीस जात तर घाबरुनी दयाळे!
मी बैसलों करित शोक तुझ्यासमक्ष
कां फेकिशी मजवरीं न कृपाकटाक्ष? ४६
गेली कुठें तव दया सखये! कळे न?
गेलीस कीं विसरुनी स्वमनामधून?

---

१ हृदय.

कीं प्रेम तें तव मनोभुवनामधील
गेलें उडून पतिच्यावरचें अमोल ? ४७
लावण्य यद्यपि तुझें नव्हतें अपूर्व
होते तथापि तव सद्गुण तेविं सर्व !
होतीस तूं मजशिं रूपवती म्हणूनी
प्रेमें न तृप्त मन हें शतधा बघूनी ! ४८
हे चक्षुंनो ! सुकृत जोंवारि अल्प राहे
घ्या तोंवरी बघुनि सुंदर रूप हो ! हें !
पाहाल 'सुंदर' जगामधिं सर्व कांहीं
सौंदर्य हें परि तिथें दिसणार[1] नाहीं ! ४९
आश्चर्य हें जगतिं या किति थोर आहे
मन्मित्र जे करिति ते अरिची कृती हे !
छे छे ! कधीं न अरि भस्म करील कांता
का मित्र हो ! मग तुम्ही जमलांत आतां ? ५०
माझी सखी सुखि असो मम जीविताची !
माझे करांतुनि नका अजिं नेउं साची !
शय्या जिला मृदु खुपे, तिजला कशाची
सोसे चिता कठिण दारुण[2] लाकडाची ? ५१
गेलेच ते सखिस घेउनि हाय ! गेले !
अग्नीस अर्पुनि गृहीं परतूनि आले !
केलें मला परि तयीं अति दीनें[3] केलें !

---

१ मिळणार—पाठांतर. २ 'भेसुर'—पाठांतर. ३ 'गाय'—पाठांतर.

हे मित्र हो ! अतुल हे उपकार झाले ! ! ! ५२
येऊनियां तुजबरोबर मी स्मशानीं
आलों गृहास तुज तेथचि गे ! त्यजूनी !
रागावुनी ह्मणुनि गेलिस अंतरालीं
माझी अशी न कळतां कशि चूक झाली ? ५३
अग्नीच तो जननिभक्षक, त्यास काय ?
जाळूनि भस्म करणें; कृति एक होय !
ती तो करून बसला सखि ! जाळुनीयां
जे दुष्ट, ते असति तत्पर दुःख द्याया ! ५४
सारांश, मत्प्रणयमंदिर हें त्यजूनी
जावें तुवां लिखित हें विधिचें ह्मणूनी
गेलीस तूं त्यजुनियां मज, देवलोकीं
हे वत्सले ! मजशिं ये परि दैन्य लोकीं ! ५५
जेथें न मृत्युभय, शोक न लेश जेथें !
जेथें न कष्ट, यम-जाच कधीं न जेथें !
ऐसें सुरालय असो; परि हाय ! तेथ
गे ! काय ये हृदयरंजनशील कांत ? ५६
मात्र प्रिये ! मज अतां तव सद्गुणांचा
येथें पडेल न कधीं विसर त्रिवाचा !
ध्यानीं मनीं हृदयिं घोळत राहत्येस
प्रत्यक्ष देशि न परी मज दर्शनास ! ५७
सौभाग्यदायक तुझा मुखचंद्र पूर्ण
अद्यापि तो ! दिसतसे सुखद प्रसन्न !

भाळीं विशाळ, चिरि ती नव कुंकुमाची
नामावली जणुं असे प्रणयी जनाची[1] ! ५८
निःशंक ज्यांत विलसे अनुराग लीलें
[2]ज्यांच्या कटाक्षिं मम जीवित धन्य झालें,
ते पाणिदार सरसीरुहसार डोळे
अद्यापि गार करिती मज चारुशीले ! ५९
प्रेमें करांत कर घालुनि फार वेळां
केल्याचि आपण किती तरि गोड लीला !
गोष्टी तशाहि करितां दिनरात्रि गेल्या
न ज्ञात त्या परि कधीं अपणांस झाल्या ! ६०
जातांच तूं प्रियतमे ! त्रिदशालयाला
गेली सुकूनि रुचिरा नवपुष्पमाला !
तैशीं शिरीषकुसुमें श्रवणावतंसें
म्लाना मुखासहचि भासतिं दीन ऐसें ! ६१
त्वत्कांत मी, परि असे गुणहीन फार
माझेवरी करि कृपा न रमा उदार !
तेणें तुला कनकभूषणसंघभोग
झाला नसे विपुल; केवळ दैवयोग ! ६२
जे म्यां अलंकरणसंघ तवार्थ केले
ते सर्वथैव दिसतात तुझे भुकेले !

---

१ तुझा प्रिय जन जो मी त्याचीं नामाक्षरें, असा भाव.
२ 'ज्यांच्या कटाक्षनिकरीं मज धन्य केलें'—पाठांतर.

पुष्पें जशीं विखरुनी पडती लतेचीं
झाली स्थिती तशिच गे ! तव भूषणांची ! ६३

मी आपुल्या ह्मणुनि अश्रुजलेंकरूनी
न्हाणीत त्यांस बसलों तुजला सरूनी !
त्वत्संगती सुखद त्यांप्रति थोर व्हावी
तों तत्स्थितीच उलटी सखि ! म्यां पहावी ! ६४

रंभाहि भूवर पडे उलथूनि जेव्हां
घेती दलें त्वरित काढुनि सर्व तेव्हां !
तेवीं तुझीं मृदुल, सुंदर आणि भारीं
बंदींत सर्व पडलीं वसनें बिचारीं ! ६५

वाली नसे कुणि जयां जगतांत पाहीं
ज्यांच्यांत राम ह्मणुनी उरलाच नाहीं !
धिक् धिक् ! जिणें; जगतिं त्यां किति होय जाच ?
आजन्म त्यांस घडते परतंत्रताच ! ६६

संसार जेथ तव सुंदर थाटलासे !
ज्या टापटीप करिंची तव लागलीसे !
तें राज्य केवल तुझें तुजला अमोल !
भोगूं न दे तुज परी यम दीर्घ काल ! ६७

चित्रें तुवां स्वकरिं सुंदर रेखियेलीं !
हंड्या, तरू, सुतबकें, नव गुंफियेलीं !
वस्त्रें, रुमाल, लुगडीं, खण आणि चोळ्या
चैतन्यहीन अवघ्या सखये ! जहाल्या ! ६८

पर्यंक सुंदर, तशी मृदु दिव्य शय्या
प्राणप्रिये ! व्यथित गे ! करिती अहा या !
तेवीं दुज्या परिचिता तव वस्तु कांते !
धैर्याचला ढळवुनी रडवीति मातें ! ६९

बाळें तुझीं रुचिर दोन जधीं निमालीं
शोकें तधीं विकल होतिस तूं जहाली !
द्याया मला सहज धीर तथापि शोक
त्वां सर्वथैव गिळिला करूनी विवेक ! ७०

आतां परी न मज तोचि सुचे विवेक
मी अर्पि द्या जरि तुला कविता अनेक !
स्वप्नीं जणों मम विवाहित आयु गेलें
तें यापुढें न समजे किति राहियेलें ? ७१

राहो कितीहि परि हे मम भाग्यवंते !
साक्षात् कृपाघन जरी उठवील तूतें
देईन सत्य कथितों तुज सर्व आयु
येवो करो तुज सजीवचि जीववायु ! ७२

मी त्या यमा करिन अर्पण पुण्य तेंही
माझेकडून घडलें असल्यास कांहीं !
कोठें नसे कधिंच आजवरी जहालें
तें या अशा समयिं कां घडणार बाले ! ७३

नाहीं परंतु तव जीवित धन्य झालें
तारुण्यभोग न तुवां बहु भोगियेले !

नाहीं तुझा सुकुसवा अति धन्य झाला
जो एक पुत्र, तुजदेखत तोहि गेला ! ७४

आनंदिवृत्ति असशी तरि तूं धरूनी
जें थोडकें धन मिळे बहु तें गणूनी
त्वत्सद्गुणांपरि न थोरवि त्या धनाची
शोभा तुला अतुल शोभवि शीलतेची ! ७५

ऐशा तुझ्या सुकरिं भाकर आणि भाजी
खाऊनि तुष्ट मन राहिल का न राजी ?
जेथें असे युवतिकांतमन प्रसन्न
तेथें कदन्न, परि तें गमतें सदन्न ! ७६

त्वां पाहिले मजसवें जरि भिन्न देश
क्षेत्रें, वनें, उपवनें, भुवनप्रदेश !
सृष्टिस्वरूपरुचिरप्रियदर्शनाची—
नाहींच हौस पुरली तुझिया मनाची ! ७७

मोदें प्रवास करुनी रमवूं मनास,
दावूं प्रिये! तुज मनोहर भूप्रदेश !
दावूनि आणुं तुज भारतवर्ष सारा
जेथें असे पसरला विभुचा पसारा ! ७८

तें राहिलें परि मनांत तसेंच सारें
आयुष्य मात्र तव गे ! सरलें बिचारें !
हेतू न एकहि तुझा परिपूर्ण झाला
हें खातसे बहुतची अझुनी मनाला ! ७९

माझ्यासवें तदपि तूं जबलपुरीला
ब्रध्नापुरीस[1] तदनंतर नाशिकाला
येवूनि सृष्टिनववैभव पाहिलेंस
धन्य स्वतास ह्मणुनी सखि ! घेतलेंस ! ८०

रेवा[2]तटाक तुजला रमणीय झाला
स्नानीं पवित्रचि जिच्या तव देह केला
प्रत्यक्ष नांदत असे शिव तेथ आज
घेऊनि अंकिं बसला गिरिजा सतेज ! ८१

तें गौरिशंकरसुमंदिर पाहुनीयां
कैलास सुंदर जणों इहलोकठायां
इच्छेवरूनि विभुच्या उतरे तटाकीं
श्रीनर्मदा करुनि पावन तो विलोकी ! ८२

त्या पर्वतां[3]वरुनि धांवत ती सवेग
मारी धडाधड उड्या सरितां[4] अमोघ !
पाहूनि तें तुजशिं वाटत काय होतें ?
"ही दुग्धवृष्टि करिती जणुं मेघ हो ! ते !" ८३

तो धबधबा पुनरपी सखि ! ये बघाया
घे पारणें त्वरित फेडुनि चक्षुचें या !
छे ! हा तुझ्याच करितां रडतो खराच
आक्रोश थोर करि, टाकुनि अश्रु साच ! ८४

---

१ बऱ्हाणपुर. २ नर्मदातीर. ३ 'भेडा' नामक घाटावरून.
४ नर्मदा.

ब्रह्मापुरी जवळच्या तर लालबागें
टाकीयलें अखिल वैभव तें शुभांगे !
जाणें तुझें परिसुनी सखि! देवलोकीं
मूर्च्छा तया प्रबल पातलि ती विलोकी ! ८५
ये ये त्वरें चरण लाव तुझा तयातें
त्या आण गे ! टवटवी सखये ! पुन्हां ते !
प्रेमानुरक्त चरण प्रिय सुंदरीचे !
गे ! हे अशोक तरु वांच्छिति नित्य साचे ! ८६
द्राक्षें सुपक्व तुज ओपुनियां उदंड
द्रोणात्मजप्रियनिवासगिरी[1] प्रचंड—
झाला खरोखर जगीं अति धन्य झाला
त्वां मात्र तो पुनरपी नच पाहियेला ! ८७
औत्सुक्यवर्धक अलौकिक सृष्टिशोभा—
तेथील, केवळ तुझी गमते यशोभा !
डोळे भरून तिज पाहुनि एकदां घे
स्वर्गीं नसेल असलें स्थल एकही गे ! ८८
ये ये ! त्वरें ह्मणुनि तूं परतूनि ये ये !
प्राणप्रिये ! रसिकरंजनशालिनी ! ये !
लोकप्रसिद्ध गड आशिर थोर आजीं
पाहूनि येउं, चल, तेथिल वृक्षराजी ! ८९
ह्या पर्वतावरुनि निर्झर हे कशांचे—
पीयूषशा सुरस गोड पयोधराचे ?

२६८

१ आशिरगड.

आरोहणें तव सखे ! त्रिदिशालयांत
दु:खाश्रु ढाळि जणुं सातपुडा अनंत ! ९०
गोदावरीतटिं असे चिर वास ज्याचा
ज्या पादपद्मकणलाभ घडे रघूचा !
सौभाग्य जें रुचिर पश्चिमदिग्वधूचें
जें स्थान होय रमणीय सुरासुरांचें ! ९१
डोकावुनी गिरि[1] जयाप्रति पाहताती
आकाशचुंबित जिथें तरु डोलताती !
वाहे जिथें झुळझुळां नव शीत वात
भृंगावली रमति होउनि जेथ मत्त ! ९२
श्रीरामचंद्र दयितेसह जेथ राही
सीतेसह प्रतिदिनीं वनराजि पाही !
जेथें परंतु घडतां दयितावियोग
तो कंठ मुक्त करुनी रडला सराग ! ९३
तें क्षेत्र हें रुचिर नाशिक तेधवांचें
अद्यापि साम्य करि जें अमरावतीचें !
गेलीस कां विसरुनी सुख त्या स्थलाचें
जें होय गे ! विरल या जगिं भोगण्याचें ! ९४
तीर्थें, व्रतें, करुनि दर्शन देवतांचें
झालें शरीर तव सुंदर धन्य साचें !
ते धन्य धन्य नर, या स्थलिं जे रहाती
गोदावरीजल सदोदित सेविताती ! ९५

---

१ सह्याद्रि.

२६६

जों जों तुझ्या हृदयमंदिरिं मोदवृत्ति,
स्नेहार्द्रता, पतिपदीं सहज प्रवृत्ति;
यांचा प्रकाश सखये ! पडुं लागला गे !
तों तों विशेष मजला तव छंद लागे ! ९६
जों जों तुझी चतुरता, स्वजनैकनिष्ठा,
श्रीअंबिकाचरणतत्परता वरिष्ठा
इत्याद्यनेक विलसूं गुण लागले गे !
तों तों विशेष मजला तव छंद लागे ! ९७
गेले तुझ्यासहचि सद्गुण पार झाले !
प्राणाबरोबर तुझ्या अति दूर गेले !
लागे !
त्वच गे ! ०
तेणें
त्वत्प्रे ८
मन्नेत्रि घालीत सखे ! बसतों अहा ! या
होईल संस्मृति मला चिरकाल तेणें
मी त्वन्मय त्रिजग पाहिन आदरानें ! ९९
माझ्या सुखांत सुख मानित राहणारी
मद्दुःख मंजुवचनें झणिं हारणारी
देणारि धीर मज संकटकालिं थोर
कोठें मिळेल मजला दयिता उदार ? १००
माझे मनीं ह्मणुनि संतत घोळत्येस
प्रेमाश्रुंनीं सतत तूं मम नाहत्येस !

REFBK-0000277
REFBK-0000277

गे ! कांहिं काल धरशील मनांत धीर
येईन खास तव सन्निध मी अधीर ! १०
वाणी तुझी श्रवणरंजनशालिनी ते
आनंद देइल कधीं हृदयासि कांते ?
आतां सुहास्यमुखपंकज सुंदरीचें
रे पाहणें नयन हो ! नशिबांत कैचें ? १०२
तूं मत्सखी मज बहू प्रिय तूंच होशी
झालों खरोखर तुझ्याविण मी विदेशी !
सेवी तथापि तव मी चरितामृतातें
प्रेमें करूनि 'सखीसंस्मृति' शोकदा ते ! १०३

**समाप्त.**

## उपसंहार.

### श्लोक.

नाहीं ज्यां रुचणार ही मम कृती, मत्प्रार्थना त्यां अशी
द्यावी गोड करूनि ही बुधवरीं, ती बालवाणी जशी !
प्रेमार्द्रादयितावियोगदहनीं ज्यांचीं मनें पोळतीं
जे कोणी असती तसे रसिकही, त्यां आवडो ही कृत